## मोदी रेल्वे क्वार्टरजवळ रॉडने मारहाण; तरुण जखमी

**सोलापूर :** मोदी परिसरातील रेल्वे क्वॉर्टरजवळ थांबले असता अनोळखी इसमांनी लोखंडी रॉडने केलेल्या मारहाणीत अबुसईद खताळ दंडू (वय ३३ रा.मोदीखाना मशिद जवळ) हे जखमी झाले. ही घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली.

अबुसईद दंडू हे शनिवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास मोदी परिसरातील रेल्वे क्वॉटर समोर थांबले होते. त्यावेळी अनोळखी ४ लोकांनी अज्ञात करण्यावरून त्याांना मारहाण केली. जखमी अवस्थेत त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर बझार पोलिसात याची नोंद झाली आहे.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड







www.surajyadigital.com । सोमवार, दि. ९ डिसेंबर २०२४ । वर्ष : २३ वे अंक : ७० वा किंमत : ५ रुपये पाने ८



## काय म्हणतंय, मारकडवाडी

# नारीशक्तीचा एल्गार ...
# ठिणगीचा वणवा देशभर पेटला पाहिजे

**सोलापूर/प्रतिनिधी**

**महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार हे रविवारी माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी गावात येवून गेले. त्यांचा दौरा फारसा गाजला नाही पण पवार कडाडले. त्याविषयी मात्र चर्चा झडू लागली आहे. पवारांची भाषणबाजी झाली. त्यांनी नव्या सरकारपुढे काही प्रश्न उपस्थित केले. 'ईव्हीएम हटाव-बॅलेट लाव'ची गर्जनाही त्यांनी केली. पुढील प्लॅन काही त्यांनी सांगितला नाही. पण उपस्थित महिलांनी एकजूट दाखवून ईव्हीएमच्या विरोधात वज्रमूठ आवळली. मारकडवाडीत पडलेल्या ठिणगीचा देशभर वणवा पेटला पाहिजे, अशा शब्दात नारी शक्तीने पवारांसमोरच महिलांनी एल्गार पुकारला. शरद पवार पोहोचल्यानंतर त्यांनी तिथून लाँग मार्चला सुरुवात केली. मारकडवाडीत शरद पवारांनी ग्रामस्थांना संबोधन केले. तसेच, शरद पवारांसमोरच उपस्थित महिलांनी शासनाविरोधात एल्गार पुकारला. काही महिलांनी उत्स्फूर्त भाषणे करून शासनाला कोंडीत पकडलं आहे. एक महिला म्हणाली, 'आमचे मतदान व्हायचे होते ते झाले नाही. आमच्यावर शासनाने अन्याय केला. बॅलेट पेपरवर मतदानही करू दिले नाही. त्यामुळे आमच्यावर अन्याय झाला. पोलिसांनी दमदाटी करून गुन्हा दाखल करू असे पोलीस म्हणत होते. आम्हाला न्याय मिळालाच पाहिजे.''**




दुसऱ्या महिलेने कवितेच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले आणि अहिल्याबाई होळकर यांच्या नावाचा गजर करत ईव्हीएमविरोधात न्याय मागितला. ''लाडक्या बहिणीचा मुद्दा समोर करून तुम्ही आमच्या अहिल्येचा अपमान करत आहात. तुम्ही स्वःतच्या हिंमतीवर अनेकांना जगवलं होतं'', असं म्हणत सदर महिला पुढे म्हणाली, ''मारकडवाडीत पडलेल्या ठिणगी वणवा देशभर पेटला पाहिजे.''

फक्त महिलाच नव्हे तर शाळकरी मुलीनेही ईव्हीएम विरोधात एल्गार पुकारला. एक मुलगी म्हणाली, ''आमच्या आमदारसाहेबांना जास्त लीड मिळायचं. पण यंदा मिळालं नाही. त्यामुळे या शकंचे निरसन व्हावं म्हणून बॅलेट पेपरवर मतदान करण्याची मागणी केली. पण, आम्हाला बॅलेट पेपरवर मतदान करू दिलं नाही. हा आमचा हक्क आहे तो आम्हाला मिळालाच पाहिजे, ईव्हीएम हटवा, आणि देश वाचवा.''

### पवार काय म्हणाले?

ग्रामस्थांना संबोधित करताना पवार म्हणाले, 'आज जगात कुठेही ईव्हीएमचा वापर होत नाही. मग भारताच याचा वापर का सुरू आहे. आज तुमच्या गावाने एका वेगळ्या पद्धतीने जायचे ठरवले तर सरकाने तुमच्याविरोधात खटला भरला. माझी तुम्हाला विनंती आहे की, तुमच्यावर दाखल करण्यात आलेल्या



खटल्याची सर्व माहिती मला द्या. याबाबतची तक्रार आम्ही राज्याचा निवडणूक आयोग, मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांकडे देऊ. हे कशासाठी? तर निवडणूक यंत्रणांचा काळ सोकू नये म्हणून. ''

**हे कसलं राजकारण? :** मारकडवाडीतील माजी सरपंच असणारे आजोबा संतापले. लाडकी बहीण नाही तर लाडकी मशीन आणली गेली आहे, अशी टीका त्यांनी केली. मारकडवाडीकरांनी देखील परखडपणे आपली बाजू मांडत न्याय मागितला. एका वृद्ध ग्रामस्थांनी देखील आपला संताप व्यक्त थेट पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला. हे कसलं राजकारण असं म्हणत स्थानिकांनी आपला निषेध नोंदवला.

### फडणवीसांना दिले उत्तर

पवार यांनी विधानसभा निवडणुकीच्या निकालाचे विश्लेषण करताना म्हटले होते की, काँग्रेस पक्षाला ८० लाख मते पडूनही त्यांचे फक्त १६ आमदार विजयी झाले. शिवसेनेला (एकनाथ शिंदे) ७९ लाख मते मिळाली आहेत आणि ५७ आमदार निवडून आले आहेत. म्हणजे एक लाख कमी मतदान मिळूनही जवळपास ४१ आमदार अधिक निवडून आले आहेत.

पवार यांच्या विधानाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट करत उत्तर दिले होते. यावेळी फडणवीसांनी, 'पवार साहेब आपण ज्येष्ठ नेते आहात, किमान आपण तरी देशातील जनतेची दिशाभूल करू नका,' असे म्हणत मतांचे गणित सांगितले होते. यावर आता पवार यांनी फडणवीसांना ग्रामस्थांसमोर, 'मी काय चुकीचे केले?' असा प्रश्न केला आहे.

### जानकर-सातपुते समर्थकांमध्ये वादावादी

उत्तम जानकर आणि आमदार राम सातपुते यांच्या समर्थकांमध्ये वादावादी झाली. मारकडवाडीत फडणवीस यांचा अभिनंदनाचा फलक लावण्यात आला होता. या बॅनरवर 'ईव्हीएम हटाव, देश बचाव'चा बोर्ड लावण्यात आला. सातपुते यांचे समर्थक असलेले ग्रामस्थदेखील सक्रिय झाले आहेत. सातपुते यांनी या ठिकाणी विकास कामे केले आहेत. त्यामुळे त्यांनाही मत मिळाले आहेत, असे राम सातपुते समर्थकांनी म्हटले.




### जसास तसे उत्तर

माजी आमदार राम सातपुते यांनी विरोधकांना जशास तसे उत्तर दिले आहे. तू मारल्यासारखे कर, मी रडल्यासारखे



करतो,असा प्रकार सुरू आहे.पवारांना माझे आव्हान आहे की,हिम्मत असेल तर त्यांनी सुप्रिया सुळेंचा राजीनामा घ्यावा आणि बॅलेट पेपरवर निवडणूक लढवून दाखवावी. दूध का दूध,पानी का पानी निश्चितच होईल. पवारांच्या दौऱ्यात मोहिते-पाटील यांनी गुंड आणून लोकांना धमक्या दिल्या. आमच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली. पवारांच्याप्रमाणे राहुल गांधी यांच्या दौऱ्यातही धमक्या दिल्या जातील. असे प्रकार होणार असतील तर आम्ही त्यांना सोडणार नाही. आमच्याही आता सभा होतील.

### आ.जानकर यांना पाटलांची सक्त ताकीद

मारकडवाडीच्या जनतेचा लढा माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी हातात घेतल्याने त्यांचे कौतुक आहे. फक्त माझ्या परवानगीशिवाय आमदारकीचा राजीनामा देऊ नका. राजीनामा दिला आणि पुन्हा निवडणूक झाली तरी तुम्हीच निवडून येणार आहात, याबाबत माझ्या मनात शंका नाही. पण, माळशिरसमध्ये बॅलेट पेपरवर पोटनिवडणूक घ्यायला आम्ही तयार आहोत, असे सरकारने सांगितले, तरच आपण राजीनामा देऊ, अशी ताकीद राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आमदार उत्तम जानकर यांना दिली. मारकडवाडीच्या सभेत जयंत पाटील बोलत होते.

## फिट्स आल्याने ट्रॅक्टर उलटून चालक जखमी

**सोलापूर :** कारखान्यात ऊस रिकामा करून परत जात असताना वाटेत अचानक फिटसचा झटका आल्याने ट्रॅक्टर उलटून चालक गंभीर जखमी झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास वटवटे (ता.मोहोळ) मार्गावर शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

दीपक उमेश रजपूत (वय २५ रा.बीड सध्या रा. जकराया सा.कारखाना, वटवटे) असे जखमी झालेल्या ट्रॅक्टर चालकाचे नाव आहे.

त्याला खासगी रुग्णालयात उपचार करून युवराज पवार (मुकादम) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. दीपक रजपूत हा शुक्रवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास जकराया कारखान्यात ऊस रिकामा करून ट्रॅक्टर घेऊन परत निघाला होता.

येनकी गावाजवळ अचानक झटका आल्याने ट्रॅक्टर उलटून तो जखमी झाला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## कुमठेतांडा येथे विवाहित महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर/प्रतिनिधी**

एका ४० वर्षीय विवाहित महिलेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना कुमठेतांडा (ता. उत्तर सोलापूर) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली.

रेखा ब्रह्मदेव राठोड (वय ४० रा.कुमठेतांडा) असे मयत महिलेचे नाव आहे. आज सकाळी ११ वाजेच्या सुमारास तिने राहत्या घरातील छताच्या लोखंडी अँगलला नायलॉन दोरीने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असतात ती उपचारापूर्वी मयत झाली. मयत रेखा राठोड हिच्या पश्चात पती १ मुलगा आणि १ मुलगी असा परिवार आहे. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

### मार्डी येथे मुलीने तांब्या फेकून आईस मारले

घरगुती भांडणात मुलीने रागाच्या भरात तांब्या फेकून मारली. डोकीस मार लागल्याने आई जखमी होऊन बेशुद्ध झाली. ही घटना मार्डी (ता.उत्तर सोलापूर) येथे रविवारी दुपारच्या सुमारास घडली. सुलभा सतीश साठे (वय ४० रा.मार्डी ता. उत्तर सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. त्यांना बेशुद्ध अवस्थेत सतीश साठे (पती) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. रविवारी दुपारी २ वाजेच्या सुलभा आणि त्यांच्या मुलीचे घरगुती कारणावरून तक्रार झाली होती. त्यावेळी मुलीने तांब्या भिरकावून मारली. तांब्या डोकीत लागल्याने त्या जखमी होऊन बेशुद्ध झाल्या. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### अरबळी येथे जावयास मारहाण; पतीसह तिघांवर गुन्हा

मोहोळ : सासरी गेलेल्या जावयास दगड, खोऱ्या आणि काठीने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना अरबळी (ता. मोहोळ) येथील डोके वस्तीत शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी कामतीच्या पोलिसांनी जखमीची पती हिच्यासह तीघांवर गुन्हा दाखल केला आहे.

परमेश्वर सुरेश भोई (वय २७ रा.घोडेश्वर ता. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. त्याला मारहाण केल्याप्रकरणी त्याची पती रुक्मिणी परमेश्वर भोई, कौशल्या आणि तिचा मुलगा नितीन संतोष भोई (सर्व रा. अरबळी ता. मोहोळ) या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. परमेश्वर भोई हा शुक्रवारी सायंकाळी अरबळी येथे पतीकडे गेला होता. त्यावेळी घरगुती भांडणातून वरील तिघांनी त्याला मारहाण करून जखमी केले अशी नोंद पोलिसात झाली.

हवालदार माने पुढील तपास करीत आहेत.

### लिंबीचिंचोळी येथे रात्री अपघात

## मारहाणीत क्रुझरचा चालक जखमी

**सोलापूर :** मोटारीचा अपघात झाल्यानंतर गावातील लोकांनी मारहाण केल्याने क्रुझर मोटारीचा चालक जखमी झाला. ही घटना अक्कलकोट ते सोलापूर मार्गावरील लिंबेचिंचोली जवळ शनिवारी रात्रीच्या सुमारास घडला.

तेजस भाऊसाहेब शिंदे (वय २४ रा. अक्कलकोट रोड सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. त्याला उपचारासाठी ॲम्बुलन्समधून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेजस शिंदे हा शनिवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास अक्कलकोट ते सोलापूर असा क्रुझर मोटारीतून निघाला होता. लिंबीचिंचोळी येथील पॉवरग्रीड जवळ समोरून येणाऱ्या मालवाहतूक रिक्षाला धडकल्याने अपघात झाला होता.

त्यावेळी गावातील ८ ते १० लोकांनी मिळून त्याला लाथाबुक्क्याने मारहाण केली होती. त्यानंतर त्याला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## अकलूज येथे पैशाच्या कारणावरून महिलेस मारहाण

### पाच जणांवर गुन्हा दाखल

**अकलूज/प्रतिनिधी**

उसने दिलेले पैसे परत दे, या कारणावरून एका ४० वर्षीय महिलेला लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आली. ही





घटना शुक्रवारी सकाळच्या सुमारास अकलूज येथील इंदिरा घरकुल येथे घडली.

राजश्री संजय खंडागळे (वय ४० रा. इंदिरा घरकुल) असे जखमीचे नाव आहे. अकलूज येथील रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले. त्यांना मारहाण केल्याप्रकरणी योगेश संजय वाघमारे, रेखा संजय वाघमारे, भामाबाई पाटोळे, सुकन वाघमारे आणि बालाजी पाटोळे (सर्व रा. इंदिरा घरकुल) असे जखमीचे नाव आहे. त्या सर्वांनी मिळून त्यांना तुला दिलेले पैसे परत दे, असे म्हणून मारहाण केली, अशी नोंद पोलीसात झाली. हवालदार पोरे पुढील तपास करीत आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आम्हाला बस् !


### मारकरवाडीप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांचा इशारा

# ईव्हीएमबाबत लोकांमध्ये दिशाभूल करणाऱ्यांवर कारवाई

**सोलापूर/प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या नियमानुसार सोलापूर जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदार संघात मतदान, मतमोजणी प्रक्रिया पार पडली आहे. मतदान प्रकियेबाबत नागरिकांमध्ये संभ्रमावस्था अवस्था निर्माण करीत आहेत. त्याबद्दल ८९ तक्रारदारांवर कायदेशीर कारवाई केली गेली आहे. मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेत ईव्हीएम बाबत तक्रार असल्यास पुराव्यासहित तक्रार करा, सत्यता आढळून आल्यास पुढील कार्यवाही केली जाईल पण खोटी तक्रार दिसून आली आणि त्यामध्ये काहीही खोटी क्रिया दिसून आल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल,असा जिल्हा अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस विधानसभा मतदार संघातील मारकडरवाडी येथील प्रकरण सध्या गाजत आहे.त्यापार्श्वभूमीवर आशीर्वाद यांनी रविवारी सायंकाळी पत्रकार परिषद बोलावली होती.त्यात त्यांनी प्रशासनाची भूमिका व्यक्त केली. बूथ क्रमांक ९६,९७,९८ या बुथमधील एव्हीममध्ये घोळ आहे. असे म्हणीत फेर मतदान आणि फेर



मारकडवाडी येथील मतदान कमी पडल्याने पुन्हा प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी मागणी करत त्यांनी आंदोलन सुरू केले आहे.

मी सोलापूर जिल्ह्याचा जिल्हा अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी या नात्याने माझ्यावर कोणत्याही प्रकारच्या दबाव नाही. सोलापूरमध्ये दोन्ही निवडणूक लोकसभा आणि विधानसभा ही निवडणूक आयोगाच्या नियमानुसार झाली. ती आचार संहितेपासून ते मतमोजणीच्या शेवटच्या क्षणापर्यंत प्रत्येक प्रक्रियेत राजकीय पक्षाच्या उमेदवार प्रतिनिधींच्या समोर सीसीटीव्ही यंत्रणा,सुरक्षा यंत्रणा आणि निवडणूक अधिकारी आणि कर्मचारी समोर एव्हीम टेस्टिंग, बॅटरी टेस्टिंग,मॉक टेस्टिंग झाल्यावरच मतदान प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. इव्हीएम मशींनला कोणत्याही प्रकारची जोडणी यंत्रणा म्हणजेच ब्ल्यू टूथ, इंटरनेट, वायरलेस जोडणी नसल्याने हे मशीन हॅक करता येत नाही, विशेष करून एकाच वेळी सक्रिय करता येते. पुन्हा सक्रिय होत नाही. सोलापूर जिल्ह्यातील मारकरवाडी सोडले तर कोणत्याही मतदार संघात उमेदवारांनी तक्रार केली नाही. ज्यांची आली आहे.त्याची तक्रार सोडविण्यात येईल पण एव्हीम बाबत आणि मतदान प्रक्रियेत संशय घेत फेर मतदान फेर मतमोजणी करा अशी तक्रार केली असून आंदोलन सुरू आहे.हे अयोग्य आहे असे आशीर्वाद यांनी म्हटले.

### सर्व तक्रारींचे निराकरण केले जाईल

शहर उत्तर मधील आघाडीचे उमेदवार महेश कोठे यांनी तक्रार केली असून ही तक्रार निवडणूक आयोगाच्या नियमनुसार सोडविण्यात येईल याला ठराविक कालावधीमध्ये पूर्ण केली जाईल. याशिवाय आपले निवडणूक प्रक्रिये संदर्भ जे काही प्रश्न आणि त्याचे उत्तर पाहिजे असेल, शंका असेल तर इसीआय. गव्ह.या साईटवर पाहू शकता असे आवाहन केले आहे.